माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३५९४ / २०२४ / सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| अनिकेत महादेव लोंढे | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बेलाटी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | विस्तार अधिकारी, (पं.) पंचायत समिती कार्यालय उत्तर सोलापूर, जि. सोलापूर |

**( सुनावणी दिनांक - २० / ११ /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. १४.०६.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " विहित मुदतीत माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हजर आहेत. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २८.०३.२०२४ | ग्रामपंचायत बेलाटी मधील रजिस्टर न. १ ते २९ मधील सर्व व्यवहाराच्या व इतर नोंदीची प्रती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, " जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. "

विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी कोणतीही पूर्वपरवानगी न घेता सुनावणीस गैरहजर आहेत, ही अतिशय गंभीर स्वरुपाची बाब आहे.

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास उत्तर दिले नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्ज करतेवेळी ते दारिद्र्यरेषेखालील असल्याचे नमूद केले आहे. तथापि द्वितीय अपील दाखल करताना दारिद्र्यरेषेखालील असल्याचे नमूद केले नाही. यावरून अपिलार्थी दारिद्र्यरेषेखालील आहेत किंवा कसे? याबाबत विसंगती दिसून येते. तसेच अपिलार्थी यांनी मूळ माहिती अर्जात माहितीचा कालावधी नमूद केला नाही. यावरून अपिलार्थी यांनी मोघम स्वरुपाची माहिती मागितली आहे. सदर माहितीमध्ये कोणतेही तथ्य दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३५९४ / २०२४ / सोलापूर 4 | 2026 दिनांक - 1|1|2026